राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेखाली मच्छिमार सहकारी संस्थांना, बर्फ कारखाने/शितगृहे उभारणे, यांत्रिकी नौका बांधणे, गोडावून बांधणे इत्यादीसाठी अर्थसहाय्याचे सुधारित आकृतिबंध [पॅटर्न]

---

महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.
शासन निर्णय क्रमांक- रासनि-१२९३/[१५९]/पदुम-१४
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ८ जानेवारी १९९६.

:- १] शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्रमांक- एफडीएक्स ४२७५/१८२९४/१२-एडीएफ, दिनांक २ फेब्रुवारी, १९७८

२] शासन दुरुस्तीपत्रक, कृषि व सहकार विभाग क्रमांक-एफडीएक्स-४२७५/२९४८/१२-एडीएफ, दिनांक १५ मे, १९७८.

३] शासन पत्र कृषि व सहकार विभाग क्रमांक मत्स्यवि ४१७९/१५२३८/१२ पदुम, दिनांक २३ जानेवारी १९८०.

४] शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्रमांक एनडीसी २७८३/२४१२०/एडीआर-१२, दिनांक ३ मे १९८५.

५] शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्रमांक-एनडीसी-२७८७/७२७१/सीआर-४२/फिश-२, दिनांक २८ मार्च १९८८.

६] शासन पत्र, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक रासनि-१२९०/४४०५०/४२८/पदुम-१४, दिनांक १५ जानेवारी, १९९२

७] राष्ट्रीय सहकार विकास निगम नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-एनसीडीसी-१-१/८७ फिश, दिनांक ११ ऑक्टोबर, १९९४ आणि दिनांक २२ मार्च, १९९५.

८] आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांचे पत्र क्रमांक-०६११०१/१४७०/१०९५, दिनांक ४ फेब्रुवारी, १९९५ आणि दिनांक २८ ऑगस्ट, १९९५.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय सहकार/विकास निगमामार्फत, मच्छिमार सहकारी संस्थांना बर्फ कारखाना/शितगृहे उभारणे, मासळीचे जलद वाहतूक करण्यासाठी ट्रक/टेम्पो खरेदी करणे, डिझेल टँकर खरेदी करणे, गोदामाचे बांधकाम करणे इत्यादीसाठी अर्थसहाय्य देणेबाबतची योजना सन १९७७-७८ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच या योजने अंतर्गत सहकारी संस्थेने पुरस्कृत केलेल्या मच्छिमारांच्या गटास यांत्रिक नौका बांधण्यासाठी अर्थसहाय्य देण्याबाबतची तरतूद समाविष्ट आहे. याकरिता राष्ट्रीय सहकार विकास निगमाने विहित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे शासन निर्णय क्रमांक -एनडीसी-२७८७/७२७१/सीआर-४२/फिश-२, दिनांक २८ मार्च, १९८८ अन्वये, राज्यशासनाकडून मच्छिमार सहकारी संस्थांना द्यावयाच्या

१०० टक्के अर्थसहाय्याचे आकृतीबंध [पॅटर्न] पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले होते.

| बाब | रा.स.वि.नि. कडून राज्य शासनास अर्थसहाय्य | राज्य शासनाकडून मच्छिमार सहकारी संस्थेस अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १] मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण, बर्फ कारखाना/ शीतगृहे उभारणे. | ८० टक्के कर्ज | ७५ टक्के कर्ज [रा.स.वि.नि. हिस्सा]<br>५ टक्के भाग भांडवल [रा.स.वि.नि.]<br>२० टक्के खास विमोचक भाग भांडवल [राज्य हिस्सा]<br>१०० टक्के |
| २] ट्रक/टेम्पो/ डिझेल टँकर खरेदी करणे, गोदामाचे बांधकाम करणे इत्यादी. | ७५ टक्के कर्ज | ७५ टक्के कर्ज [रा.स.वि.नि. हिस्सा]<br>२५ टक्के अनुदान [राज्य हिस्सा]<br>१०० टक्के. |

२. राज्य शासनाकडून मच्छिमार सहकारी संस्थेस द्यावयाच्या अर्थसहाय्याच्या वरील आकृतीबंधात, राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी त्यांचे पत्र क्रमांक -एनसीडीसी-१-१/८७/फिश, दिनांक ११ ऑक्टोबर, १९९४ अन्वये बदल केला असून त्यांच्या सुधारित आकृतीबंध सन १९९५-९६ या आर्थिक वर्षापासून लागू केला आहे. राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी विहीत केलेल्या सुधारीत आकृतीबंधाप्रमाणे आता लाभधारक मच्छिमार सहकारी संस्थेने/मच्छिमार गटाने प्रकल्पाच्या १० टक्के रक्कम स्वतः गुंतविणे आवश्यक आहे. या तरतुदीवर आधारित राष्ट्रीय सहकार विकास निगमाने विहित केलेले सुधारित आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे :-

| बाब | रा. स. वि. नि. करून राज्य शासनास अर्थसहाय्य | राज्य शासनाकडून मच्छिमार सहकारी संस्थेस अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १] मच्छिमार नौकांचे यांत्रिकी-करण, बर्फ कारखाना/ शीतगृहे उभारणे इत्यादी. | ८० टक्के कर्ज | ५५ टक्के कर्ज<br>३५ टक्के कर्ज/अनुदान/भागभांडवल<br>९० टक्के<br>१० टक्के सहकारी संस्थेने/गटाने स्वत: गुंतविणे. |
| २] ट्रक/टेम्पो/डिझेल टँकर खरेदी करणे, गोडाऊन बांधणे इत्यादी. | ७५ टक्के कर्ज | ५० टक्के कर्ज<br>४० टक्के कर्ज/अनुदान<br>९० टक्के<br>१० टक्के सहकारी संस्थेने स्वत: गुंतविणे. |
| ३] मार्केटिंगसाठी भागभांडवल | १०० टक्के कर्ज | १०० टक्के भागभांडवल |

**शासन निर्णय :-**

३. राष्ट्रीय सहकार विकास निगमाने सन १९९५-९६ पासून पूर्वीच्या आकृतीबंधात केलेला बदल लक्षात घेता, राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या आकृतीबंधातही त्या आधारावर बदल करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता. सन १९९५-९६ पासून [१] मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण आणि [२] सुरक्षण, वाहतूक व विक्री या योजनेसाठी खालीलप्रमाणे सुधारित आकृतीबंध विहीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

| बाब | रा. स. वि. नि. कडून राज्य शासनास अर्थसहाय्य | राज्य शासनाकडून मच्छिमार सहकारी संस्थेस अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १] मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण करणे, बर्फ कारखाने/शीतगृहे उभारणे. | ८०% कर्ज | ५५% कर्ज [रा. स. वि. नि. हिस्सा]<br>५% भागभांडवल [रा. स. वि. नि. हिस्सा]<br>३०% खास विमोचक भागभांडवल [२०% रा. स. वि. नि. हिस्सा + १०% राज्य हिस्सा]<br>———<br>९०%<br>१०% मच्छिमार सहकारी संस्थेने/गटाने स्वत: गुंतविणे. |
| २] सुरक्षण, वाहतुक व विक्री या योजनेखाली<br>[अ] ट्रक/टेम्पो/डिझेल टँकर, रेफ्रिजरेटेड व्हॅन्स/इन्सुलेटेड व्हॅन्स खरेदी करणे गोदाम/शेडचे बांधकाम करणे. | ७५% कर्ज | ५०% कर्ज [रा. स. वि. नि. हिस्सा]<br>१५% भागभांडवल [रा. स. वि. नि. हिस्सा [सहकारी संस्थेने १० वर्षात परतफेड करावयाच्या अटीवर]<br>२५% अनुदान [१०% रा. स. वि. नि. + १५% राज्य हिस्सा<br>———<br>९०%<br>१०% मच्छिमार सहकारी संस्थेने स्वत: गुंतविणे. |
| [ब] मच्छिमार सहकारी संस्थांना मार्केटिंगसाठी, मत्स्यबीजाचा पुरवठा करणे इत्यादीकरिता भागभांडवल | १००% कर्ज | १००% भागभांडवल कर्ज स्वरूपात [रा. स. वि. नि. हिस्सा] |

तसेच वरीलप्रमाणे विहीत केलेल्या सुधारित आकृतिबंधानुसार, सदरच्या योजना सन १९९५–९६ पासून पुढे चालू ठेवण्यासही याद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

४. शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्रमांक–एनसीडी–२७८७/७२७१/सीआर–४२/फिश–२, दिनांक २८ मार्च, १९८८ सोबत जोडलेल्या जोडपत्रानुसार मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण योजनेंतर्गत करावयाच्या कार्यवाहीची कार्यपद्धती

राहताल-व त्याचे काटेकोरपणे पालन करण्याचे संबंधित अधिका-यांनी दक्षता घ्यावी. तसेच अर्थसहाय्याची प्रकरणे हाताळतांना खालील विहित अटींचा पूर्तता करण्याची संबंधित अधिका-यांनी दक्षता घ्यावी .-

[१] मच्छिमार सहकारी संस्थेने पुरस्कृत केलेल्या गटास यांत्रिकी नौका बांधण्यासाठी अर्थसहाय्य मंजूरी वा स्वीकृती कळविल्यानंतर, संबंधित गटाने त्यांच्या हिस्स्याची प्रकल्प किंमतीच्या १० टक्के रक्कम नौका बांधणी कंत्राटदाराला अदा करण्यासाठी, संबंधित संस्थेत जमा करावी व त्याची पोचपावती घेवून संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांना कळवावे. त्यानंतर संबंधित जिल्हा मत्स्यव्यवसाय संचालक यांनी संस्थेने पुरस्कृत केलेल्या गटास मंजूर करण्यास येणा-या ९० टक्के अर्थसहाय्यापैकी, ३० टक्के खास विमोचक भागभांडवल आणि ५ टक्के भागभांडवल याप्रमाणे ३५ टक्के रक्कम, संबंधित संस्थेस, नौका बांधण्यासाठी उपलब्ध करावी. सदर रक्कम नौका बांधणीसाठी खर्च करुन नौकेचे बांधकाम ३/४ पर्यंत झाल्यानंतर, ५५ टक्के कर्ज रक्कमेपैकी १० टक्के रक्कम, सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी नौकेचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी उपलब्ध करावी. उर्वरित ४५ टक्के रक्कम, इंजिन, विंच, जीवरक्षक साधने इत्यादि साठी संबंधित पुरवठादारांना, सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी परस्पर अदा करावी.

[२] ३० टक्के खास विमोचक भागभांडवलाचे १२ वर्षात पूर्ण कर्जफेडीनंतर गटास अनुदान म्हणून रुपांतरीत करण्यात यावे. ५ टक्के भागभांडवल म्हणून संबंधित संस्थेला मंजूर केलेली रक्कम, संस्थेने संबंधित गटास कर्ज म्हणून द्यावी आणि सदर रक्कम १२ वर्षात गटाकडून वसूल करावी आणि हे ५ टक्के भागभांडवल १२ वर्षानंतर [प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे] संस्थेने शासनास परत करावे. ~~xxxxxx~~ याबाबत शासन पत्र क्रमांक -रासनि १२९०/४४०५०/४२८/पदुम १४, दिनांक १५ जानेवारी, ९२ चे अवलोकन करावे.

५. बर्फ कारखाना/शीतगृहे उभारण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्या-करीता विहित केलेल्या अटी व शर्ती, शासन पत्र, कृषि व सहकार विभाग क्रमांक -मत्स्यवि-४१७९/१५२३८/१२ पदुम, दिनांक २३ जानेवारी, १९८० सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ [अ] मध्ये विकल्पप्रमाणे, लागू रहा.

६. ट्रक/टेम्पो/डिझेल टँकर/रेफ्रिजिरेटेड व्हॅन्स/इन्सुलेटेड व्हॅन्स खरेदी करण्याकरीता अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी विहीत केलेल्या अटी व शर्ती, शासन पत्र क्रमांक एफडीएक्स ४१७९/१५३३८/१२-एडीएफ, दिनांक २३ जानेवारी १९८० मधील उप परिशिष्ट -१[ब] मध्ये दर्शविल्याप्रमाणे, लागू रहातील. तसेच मच्छिमार सहकारी संस्थेस मंजूर करण्यात येणाऱ्या ९०टक्के अर्थसहाय्यापैकी, १५ टक्के भागभांडवल १० वर्षानंतर संस्थेने शासनास परत करावे.

७. गोदाम/शेडचे बांधकाम करण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्याकरीता विहित केलेल्या अटी व शर्ती, शासन निर्णय क्रमांक एफडीसी २७८३/२४१२०/एडीएफ-१२, दिनांक ३ मे, १९८५ मधील परिशिष्ट अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, लागू रहातील. तसेच संस्थेस मंजूर करण्यात येणाऱ्या ९०टक्के अर्थसहाय्यापैकी १५ टक्के भाग भांडवल १० वर्षानंतर संस्थेने शासनास परत करावे.

८. हे आदेश, नियोजन विभाग /वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक - प्र.क्र. ६३५/९५/व्यय-१ दिनांक २७.११.१९९५ अनुसार काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ वि. रा. बवेरे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी आणि सदस्य सचिव जिल्हा नियोजन व विकास मंडळ.
सर्व प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,
सर्व सहाय्यक मत्स्यव्यवसाय [illegible]चालक
सर्व जिल्हा मत्स्यव्य[illegible]साय अधिकारी,